CMYK


**तडीपार आरोपीसह रॉबरी करणाऱ्या आरोपीला मुद्देमालासह अटक; डोणगाव पोलिसांची कामगिरी** >> पान 2

**धनंजय मुंडेनी महाराजांचे चरित्र वाचावे - संभाजी भिडे यांचा सल्ला** >> पान 3

**अर्धवट माहिती देऊन दिशाभूल करण्याचा प्रयत्न** >> पान 4


**सुविचार**

अनुभवी माणसाचे सल्ले नेहमी मोलाचे असतात.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 203 ■ बुधवार, दि. 05 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




**२१ वर्षांपासून एकही किसिंग सीन नाही, शेवटी एका गोष्टीसाठी मोडावी लागली पॉलिसी!**

आतील पान

# अखेर धनंजय मुंडेंनी दिला राजीनामा

## मुख्यमंत्री फडणवीसांनी राजीनामा स्वीकारला



**दैनिक आपला विदर्भ**

मुंबई/प्रतिनिधी : राज्याचे अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी आज (४ मार्च) अखेर राजीनामा दिला आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धनंजय मुंडेंचा राजीनामा स्वीकारला आहे. बीडच्या मस्साजोगमधील सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणात, धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड यांच्यावर खंडणीचा आरोप आहे. याच प्रकरणातून संतोष देशमुख यांची हत्या झाली होती. संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्येचे फोटो समोर आल्यानंतर, महाराष्ट्राभरातून संतापाची लाट उसळली होती. अखेर धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला. धनंजय मुंडे यांचे सहाय्यक प्रशांत भामरे आणि प्रशांत जोशी हे दोघे धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर दाखल झाले होते.

९ डिसेंबर २०२४ रोजी बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. आवादा कंपनीकडून मागण्यात आलेल्या खंडणी प्रकरणातून ही हत्या झाली होती. धनंजय मुंडे यांचा अत्यंत जवळचा सहकारी आणि त्यांचा राईट हँड अशी ख्याती असलेला वाल्मिक कराड या हत्याप्रकरणाचा सूत्रधार असल्याचे आरोप झाले होते. सुरुवातीला बीड पोलिसांनी याप्रकरणाचा गुन्हा नोंदवून घेण्यापासून ते तपासात प्रचंड कुचराई केली होती. अखेर याप्रकरणावरुन प्रचंड रोष निर्माण होताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संतोष देशमुख हत्याप्रकरणाच्या तपासासाठी एसआयटी नेमण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर सीआयडी आणि एसआयटीने संयुक्तपणे या प्रकरणाचा तपास केला होता. यामध्ये वाल्मिक कराड आणि त्याच्या साथीदारांचा सहभाग आढळून आला होता. त्यामुळे सीआयडीने वाल्मिक कराड आणि त्याच्या साथीदारांवर मकोका अंतर्गत कारवाई केली होती. नुकतेच याप्रकरणात १५०० पानी आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. त्यामध्ये वाल्मिक कराड हाच संतोष देशमुख हत्याप्रकरणाचा मुख्य सूत्रधार असल्याचे म्हटले होते.

**संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांना तूर्त सहआरोपी केले जाणार नाही**

संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांना तूर्त सहआरोपी केले जाणार नाही, अशी खात्रीलायक सूत्रांची 'माझा'ला माहिती आहे. चार्जशीटमध्ये त्यांच्या विरोधात कुठलाही थेट पुरावा नाही. याबाबत मुख्यमंत्री कार्यालयाकडून ही कुठलीही कार्यवाही नाही. राजीनामा दिल्यानंतर आता धनंजय मुंडेंबाबतीत होणाऱ्या पुढील कार्यवाहीकडे लक्ष असणार आहे.

**वाल्मिक कराड हा बीड जिल्ह्यात धनंजय मुंडे यांचा राईट हँड म्हणून ओळखला जात होता**

वाल्मिक कराड हा बीड जिल्ह्यात धनंजय मुंडे यांचा राईट हँड म्हणून ओळखला जात होता. धनंजय मुंडे यांच्या निवडणुकीच्या काळातील प्रचाराचे व्यवस्थापन ते त्यांच्या अनुपस्थितीत बीड जिल्ह्यातील कारभाराची जबाबदारी वाल्मिक कराडच्या खांद्यावर होती, असे सांगितले जाते. वाल्मिक कराड याने आवादा या पवनचक्की निर्मिती कंपनीकडून २ कोटी रुपयांची खंडणी मागितली होती. यावरुन कंपनी प्रशासन आणि वाल्मिक कराड यांच्यात वाद होते. या वादातून वाल्मिक कराडचे सहकारी आवादा कंपनीत गेले होते. त्यावेळी त्यांनी तेथील सुरक्षारक्षकाला मारहाण केली होती. हा सुरक्षारक्षक मस्साजोग गावातील असल्याने सरपंच संतोष देशमुख आवादा कंपनीत गेले होते. त्याठिकाणी संतोष देशमुख आणि गावकऱ्यांनी वाल्मिक कराडच्या टोळीच्या लोकांना मारहाण केली होती. ६ डिसेंबर २०२४ रोजी हा वाद झाला होता. त्यानंतर या भांडणाचा डुख मनात ठेवून वाल्मिक कराड याच्या सांगण्यावरुन त्याच्या साथीदारांनी संतोष देशमुख यांचे अपहरण करुन त्यांची अत्यंत निर्घृण पद्धतीने हत्या केली होती. संतोष देशमुख यांची हत्या करतानाचे फोटो सोमवारी सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. त्यानंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली होती.

# महाजल नंतर जल जीवन मिशन योजनेचा बट्ट्याबोळ

## नागापूर येथील प्रकार : महिलांच्या डोक्यावर हंडा कायम!; हर घर नल घर घर जल योजनेचा बोजवारा जल जीवन मिशन च्या पाण्याच्या गावकरी प्रतीक्षेत..

**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव : ग्रामीण भागातील मायमाऊलींची पाण्यासाठी होणारी पायपीट थांबावी, त्यांना शुद्ध ५५ लीटर प्रति व्यक्ती याप्रमाणे पाणी उपलब्ध व्हावे, या दृष्टीने नियोजन करून शासनाने हर हर घर नल हर हर जल जलजीवन मिशन योजना राबविण्यास प्रारंभ केला आहे. मात्र, अधिकाऱ्याची भ्रष्टवृत्ती व पदाधिकाऱ्यांची उदासीनता यामुळे महाजल योजनेप्रमाणेच जलजीवन मिशनची योजनाही बोजवारा उडालेला असल्याचे चित्र नागापूर येथे दिसून येत आहे. तब्बल एक कोटी २५ लाख ३४ हजार रुपये खर्च करून करण्यात येणाऱ्या या योजनेला भ्रष्टाचाराची वाळवी लागल्याने ही योजना पूर्ण होण्यापूर्वीच बारगळण्याचे चित्र सध्या नागापूर येथे दिसून येते.परिणामी, उन्हाळ्यात नागापूर येथील मायमाऊल्यांना पाण्यासाठी पायपीट करण्याची वेळ येणार असल्याची शक्यता निर्माण झाली आहे.**



**देविदास खनपटे**
मुख्य संपादक

नागापूर येथे जल जवान मिशन योजनेसाठी तब्बल एक कोटी २५ लाख ३४ हजार रुपयांचा निधी मंजूर करून सदर योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामाला ९ मार्च २०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. सदर कामे १८ महिन्यात पूर्ण करणे अपेक्षित होते. असे असताना आता या कामाला तीन वर्षाच्यावर कालावधी होत असताना केवळ ७२.८० टक्के काम झालेले आहे. तर, या कामावर ४३ लाख ८२ हजार रुपये खर्च झाले आहेत. सदर योजनेअंतर्गत विहीर खोदकाम, पंप, पंपिंग मशनरी, जलवाहिनी, पाण्याची टाकी, पाण्याची वितरण व्यवस्था आदी काम करण्याचे कंत्राटदार यांच्यामार्फत करण्यात प्रारंभ करण्यात आला होता. मात्र, तीन वर्षाचा कालावधी होत असतानाही अद्याप जल जीवन मिशनचे काम पूर्ण न झाल्याने महाजल योजनेप्रमाणेच जलजीवन मिशन योजनांचा ही बोजवारा उडालेचा चित्र नागापूर येथे दिसून येत आहे. परिणामी, नागापूर येथील मायमाऊल्यांना पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे. उन्हाळ्यात च्या दिवसांमध्ये पाणीटंचाई उग्ररूप धारण करणार असल्याचे चित्र निर्माण झाले असून याकडे संबंधित वरिष्ठांनी लक्ष देऊन जलजीवन मिशन योजनेचे काम तात्काळ पूर्ण करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



**जल जीवन मिशन योजनेच्या जल कुंभ चे टिपलेले जानेवारी २०२५ मधील छायाचित्रे..!**

**भाग २१**



**नागापूर येथील जलजीवन मिशन पाण्याच्या टाकीचे अर्धवट बांधकाम..!**

### पाणी टंचाई उग्ररूप धारण करण्याची शक्यता

नागापूर येथे सन २०११-२०१२ मध्ये महाजल योजना राबविण्यात आली होती. मात्र, सदर योजना ही अर्धवट पडल्याने शासनाचा कोट्यावधी रुपयांचा लाखो रुपयाचा निधी व्यर्थ खर्च झाला आहे. तर, मायमाऊल्यांची पाहण्यासाठी पायपीट कायम आहे. पाणी टंचाईची गंभीर समस्या लक्षात घेता सन २०२२ मध्ये जलजीवन मिशन योजनेअंतर्गत तब्बल सव्वा कोटी रुपये नागापूर येथे कामास प्रारंभ करण्यात आला. मात्र, तीन वर्षाच्यावर कालावधी होत असतानाही सदर काम अद्यापही अपूर्ण असल्याने भविष्यात भीषण पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. परिणामी, मायमाऊलींच्या डोक्यावरची हंडा हा कायम असल्याचे चित्र आहे. अधिकाऱ्याच्या भ्रष्टवृत्तीमुळे व लोकप्रतिनिधीच्या दुर्लक्षितपणामुळे ग्रामस्थांना व मायमाऊल्यांना मात्र, पाण्यासाठी वनवन भटकंती करण्याची वेळ आली आहे.

### पाणी समस्या निकाली न निघाल्यास तीव्र आंदोलन



नागापूर येथे तब्बल सव्वा कोटी रुपये खर्च करून जलजीवन मिशन योजनेअंतर्गत प्रतिव्यक्ती ५५ लीटर शुद्ध पाणी देण्याचे मिशन शासन राबवीत आहे. मात्र, अधिकारी व ठेकेदार यांच्या मिलीभगत वृत्तीने सदर योजना ही अर्धवट पडली असून त्यामुळे गावात भीषण पाणी टंचाई ची शक्यता निर्माण झाली आहे. महाजल योजनाही अधिकारी पदाधिकाऱ्यांच्या व ठेकेदारांच्या भ्रष्टवृत्तीमुळे पाण्यात गेली आहे. आता वेळ जीवन मिशन योजनेअंतर्गत तब्बल सव्वा कोटी रुपयांचा निधी खर्च करून पाणीपुरवठा योजना राबविण्यास प्रारंभ करण्यात आला असला तरी, तीन वर्षाचा कालावधी होत असताना अद्याप काम पूर्ण झाले नाही. परिणामी, गावात भीषण पाणी टंचाईची शक्यता निर्माण झाली आहे. गावातील पाणीटंचाई निवारण्यासाठी तात्काळ उपाययोजना कराव्या व सदर आणि पुरवठा योजनेचे काम पूर्ण करावे व, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल.असा इशारा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना डोणगाव विभाग प्रमुख दीपक गायकवाड यांनी दिला आहे.

CMYK

## मातृभाषेतून शिक्षण ही काळाची गरज

शिक्षणाची भाषा कोणती असावी यावर आपल्याकडे गेली अनेक वर्ष विचारमंथन सुरू आहे. केवळ समाजातच नव्हे तर घराघरांत यावर चर्चा सुरू आहे. चर्चा कसली वाद विवादच म्हणा कारण आईवडील, नातेवाईक, शेजारीपाजारी या सर्वांमध्ये याबाबत मतभिन्नता आढळते. शिक्षणासाठी कोणते माध्यम वापरावे याबाबत तर्कशास्त्र वापरले जात नसल्याने मध्यमवर्गीय आणि निम्नमध्यमवर्गीयांचा गोंधळ उडतो. विशेषतः इंग्रजी माध्यमांच्या शाळा जशा वाढू लागल्या तसा हा गोंधळ जास्त होऊ लागला. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून सर्वसामान्य माणूसही आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करू लागला. पूर्वी शहरी भागापूरते असणारे हे लोण आता ग्रामीण भागातही पसरले आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील गरीब, कष्टकरी पालक कर्ज काढून उधार उसनवारी करून लाखो रुपयांच्या देणग्या भरून आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करीत आहेत. मुळात इंग्रजी शिकणे आणि इंग्रजी माध्यम शिक्षण म्हणून निवडणे यात पालकांची गल्लत होते. इंग्रजी शिकण्यासाठी इंग्रजी माध्यम निवडणे खरेच गरजेचे आहे का? इंग्रजी शिकण्यासाठी संपूर्ण शिक्षणच इंग्रजीतून घेणे योग्य आहे का? याचा विचार पालक करत नाहीत. मातृभाषेतून शिक्षण घेऊनही चांगले इंग्रजी शिकता येते हेच पालक विसरत चालले आहे. मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पद्धत आहे. मातृभाषा ही खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा आहे. ती भाषा मुलाला तो आईच्या पोटात असल्यापासून ऐकायला मिळते. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने मुलाची मानसिक वाढ परिपूर्ण होते कारण ते मूल ज्या वातावरणाचा भाग आहे त्या वातावरणाचे प्रतिबिंब त्याला मातृभाषेत दिसते त्यामुळे मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची आदर्श पद्धत आहे. सांस्कृतिक, सामाजिक मूल्यांची रुजवन फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात माय, माती, मातृभाषा आणि मातृभूमी यांचे अनन्यसाधारण महत्व असते. माय जन्म देते, माती भरण पोषण करते, मातृभूमी आसरा सुरक्षा देते आणि मातृभाषा योग्य संस्कार करते. या संस्काराच्या शिदोरीवरच प्रत्येक व्यक्तीचे जीवन सुखी व समृद्ध होते. म्हणून किमान प्राथमिक आणि माध्यमिक स्तरांवर तरी शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषा असली पाहिजे असे अनेक भाषातज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ तसेच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रीय व जागतिक पातळीवरील संस्था ओरडून सांगत आहेत. सुरवातीला एकदा मातृभाषेतून मूलभूत शिक्षण घेतल्यावर नंतर इंग्रजी अथवा इतर परकीय भाषा गरजेनुसार आत्मसात करणे, त्यांचा काळ परिस्थितीनुसार वापर करणे यास कोणाचीही काहीही हरकत असण्याचे कारण नाही. शिक्षण प्रणालीतून असे शिक्षण दिले पाहिजे की शिक्षण घेऊन बाहेर पडेल त्याला तो राहत असलेल्या प्रदेशातील पर्यावरणाची जाणीव असेल, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय जबाबदारीचे त्याला भान असेल देशाला भेडसावणाऱ्या समस्या व आव्हाने ओळखून त्याचा सामना करण्यास तो समर्थ असेल. युनेस्को ही युनोची शैक्षणिक क्षेत्रात काम करणारी उपसंस्था आहे. युनेस्कोने केलेल्या संशोधनातून मातृभाषेतून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची आकलनशक्ती व गुणवत्ता ही मातृभाषेतर माध्यमातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा कितीतरी चांगली व सरस असते असे आढळून आले आहे. महात्मा गांधी म्हणतात मातृभाषा शिक्षणाचे योग्य माध्यम आहे. मातृभाषेतूनच मुलांचा भावनिक आणि सामाजिक विकास होऊ शकतो. सांस्कृतिक व सामाजिक मूल्यांची पेरणी फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ अनिल काकोडकर म्हणतात, मातृभाषाच मुलांच्या स्वाभाविक शिक्षणाचे माध्यम असून त्याच भाषेतून त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. इंग्रजी माध्यमाचा विचार केला तर इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे. इंग्रजीवर प्रभुत्व मिळवलेल्या मुलांना सर्वच क्षेत्रात संधी उपलब्ध होईल असे पालकांना वाटते म्हणून पालक इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुलांना घालत असतील असे जरी मान्य केले तरी इंग्रजी माध्यमांच्या शाळेतून शिकलेले सर्वच मुले यशस्वी होतात असेही नाही. उलट आज जे उच्चपदावर पोहचलेले मान्यवर आहेत मग ते डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक, प्राध्यापक, साहित्यिक असोत की शास्त्रज्ञ, उद्योजक, नेते, अभिनेते सर्वच मराठी भाषेतून शिकलेले आहेत. आयएएस,आयपीएस, आयएफएस यांची जर यादी पाहिली तर त्यातील ९५ टक्के अधिकाऱ्यांचे शिक्षण मातृभाषेतूनच झाले आहे. मागील काही वर्षात स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक संख्या मातृभाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचीच आहे. इंग्लंड, अमेरिका, फ्रांस, जर्मनी, चीन, जपान, रशिया यासारख्या प्रगत देशातही मातृभाषेतूनच शिक्षण दिले जाते. या देशातील पालक जाणीवपूर्वक आपल्या मुलांना मातृभाषेतून शिक्षण देतात. फिनलँड सारखा देश की ज्या देशाच्या शिक्षण पद्धतीचे अनुकरण प्रगत राष्ट्रही करतात त्या देशातही मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. महाराष्ट्राबाबत बोलायचे झाले तर मुलांना इंग्रजीचे डोस पाजले तर इथला मराठी भाषेचा समृद्ध ठेवा लुप्त होईल. मुलांमध्ये, राष्ट्राभिमान, राष्ट्रीय एकात्मता, चांगल्या संस्काराचे रोपण करायला मातृभाषाच कामी येईल. शिक्षणात मातृभाषेमुळे व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. मातृभाषा ही संस्काराचा आणि संस्कृतीचा मानबिंदू आहे. जितक्या सहजतेने मूल मातृभाषेतून शिकते तितक्या सहजतेने इंग्रजीतून शिकत नाही म्हणून मातृभाषेतून शिक्षण हेच खरे शिक्षण आहे.

# तडीपार आरोपीसह रॉबरी करणाऱ्या आरोपीला मुद्देमालासह अटक; डोणगाव पोलिसांची कामगिरी

**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव/प्रतिनिधी :** विविध गुन्ह्यात तडीपार झालेल्या आरोपीस रॉबरी करणाऱ्या आरोपीला डोणगाव पोलिसांनी मुद्देमालासह तीन मार्च रोजी अटक केली.

प्राप्त माहितीनुसार डोणगाव पोलीस स्टेशन येथील दाखल अप क्र- ४३/२०२५ कलम ३०९(४),३(५) भा.न्या.सं सह कलम १४२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम च्या गुन्ह्यातील तडीपार आरोपी विवेक ऊर्फ भैय्या मुरलीधर आखाडे वय-३५ रा.लहेरी चौक, गणपती मंदीर, डोणगांव, ज्ञानेश्र्वर रामदास नवघरे वय-३२ पांगरी नवघरे ता.मालेगांव यांना ३ मार्च २०२५ रोजी वाय. टी. चौक येथे लग्नाच्या वरातीमध्ये फिर्यादी वाद्य वाजवित असतांना आरोपीने त्यांचे खिशातील मोबाईल व १२०० रुपये रोख रक्कम व रेडमी कंपनीचा १० हजार रुपयांचा मोबाईल असा एकुण ११ हजार २०० रुपयाचा मुद्देमाल चोरून नेण्याचा प्रयत्न करत असताना पोलिसांनी सदर मुद्देमाल जप्त करण्यात आला.


सदर कामगीरी पोलीस अधिक्षक विश्र्व पानसरे, अप्पर पोलीस अधिक्षक बी. बी. महामुनी, उप विभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि ए. डी.नागरे, मंगेश खडसे, आनंद चोपडे, हर्षकुमार सेहगल, निखलेश चव्हाण यांनी केली असुन पोउपनिरी संदीप सावले सदर गुन्ह्याचा तपास करत आहेत.




## जोपर्यंत संतोष देशमुखांच्या आरोपींना फाशीची शिक्षा होत नाही तोपर्यंत न्याय मिळणार नाही; करुणा मुंडे यांची प्रतिक्रिया

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** जोपर्यंत संतोष देशमुख यांना अमानुष मारणाऱ्या आरोपींना भाषीची शिक्षा होत नाही, तोपर्यंत आम्हाला न्याय मिळणार नाही. अशी प्रतिक्रिया करूणा मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली. यामुळे पुढे म्हणाल्या की, दोन दिवसांपूर्वी मी पोस्ट शेअर केली होती. आणि धनंजय मुंडेंचा राजीनामा झालेला आहे. त्यांनी ट्विटरवर ट्विट केले आहे की, तब्येतीच्या कारणाने मी राजीनामा देत आहे. हे कारण एकदम खोटं आहे, ते काल विधानभवनात होते.



नैतिकतेच्या आधारावर असायला पाहिजे होता. त्यांच्यात नैतिकता नाही, तरी, राजीनामा झालेला आहे. यापुढे पण आम्ही शांत बसणार नाही. स्वतःला वाचवण्यासाठी त्यांनी तब्येतीचं कारण दिले. धनंजय मुंडे यांचा राजीनामा आमच्यासाठी न्याय नाही, तो तर व्हायलाच पाहिजे होता. कारण त्यांनी स्वतः सांगितले होते की, वाल्मिक कराड माझा व्यक्ती आहे, त्यासाठी राजीनामा मागितला गेला.जोपर्यंत संतोष देशमुख यांच्या आरोपींना फाशीची शिक्षा होत नाही तोपर्यंत आम्हाला न्याय मिळणार नाही. अशी प्रतिक्रिया करूणा मुंडे यांनी व्यक्त केली.

## २९ वर्षांपासून एकही किसिंग सीन नाही, शेवटी एका गोष्टीसाठी मोडावी लागली पॉलिसी!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** सिनेसृष्टीत आजकाल इंटिमेट सीन, किसिंग देणं नॉर्मल गोष्ट झाली आहे. त्यामुळे तरुण कलाकार असो किंवा वयोवृद्ध सर्वच असे सीन देतात. सिनेमाच्या गरजेनुसार कलाकार असे सीन देत असतात. मात्र अशी एक अभिनेत्री जिने तिच्या २९ वर्षांच्या करिअरमध्ये एकही किसिंग सीन दिला नाही. तुम्हाला या अभिनेत्रीचं नाव वाचून आश्र्चर्य वाटेल. कारण हिचं बोलणं बोल्ड आणि बिनधास्त आहे पण तिने पडद्यावर कधीच किसिंग सीन दिला नाही.

९० च्या दशकात अनेक सुपरहिट चित्रपट देणारी ही अभिनेत्री दुसरी तिसरी कोणी नसून काजोल आहे. काजोलने नो किसिंग पॉलिसीचे पालन केले. तिने २९ वर्षे एकाही चित्रपटात किस केले नाही.

काजोलने शाहरुख खानसह अनेक मोठ्या स्टार्ससोबत काम केले. 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' सारखे अनेक सुपरहिट चित्रपट दिले. पण काम करताना त्याने काही धोरणांचे पालन केले. यापैकी एक म्हणजे किसिंग सीन देण्यास मनाई. काजोलने २९ वर्षांपासून एकाही चित्रपटात किस केले नाही. मात्र अनेक वर्षांनंतर, तिने एका ओटीटी शोसाठी हे धोरण मोडले.

काजोलने नो किसिंग पॉलिसी मोडली

काजोलने वयाच्या १६ व्या वर्षी 'बेखुदी' या चित्रपटातून तिच्या करिअरची सुरुवात केली. २९ वर्षांनंतर तिने पडद्यावर किस केलं. २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'द ट्रायल' या वेब सिरीजसाठी काजोलने 'नो-किसिंग पॉलिसी' मोडली. या सिरीजमध्ये ती सहकलाकार अली खान आणि जिशु सेनगुप्ता यांच्यासोबत लिप-लॉक करताना दिसली. मालिकेतील हे दृश्य सोशल मीडियावर खूप व्हायरल झाले. काजोल ही पहिली अभिनेत्री आहे जिला नकारात्मक भूमिकेसाठी फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. १९९८ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'गुप्त: द हिडन ट्रुथ' या चित्रपटात काजोलने नकारात्मक भूमिका साकारली होती. वेगवेगळ्या चित्रपटांसाठी अनेक पुरस्कार जिंकण्यासोबतच तिने पद्मश्री पुरस्कारही जिंकला आहे. वर्षानुवर्षे काजोल जेव्हा जेव्हा कोणत्याही कार्यक्रमात पोहोचते तेव्हा चाहते तिला खूप प्रेम देतात. इन्स्टाग्रामवर लाखो लोक या अभिनेत्रीला फॉलो करतात. अभिनयासोबतच काजोलला काल्पनिक कथा लिहिण्याचीही आवड आहे. पण अभिनेत्रीला चित्रपटांच्या पटकथा वाचण्यापेक्षा त्या ऐकायला जास्त आवडतात.

## धनंजय मुंडे यांनी पापात सहभागी व्हावं, स्वत:हून मी हे पाप केलं अस म्हणायला पाहिजे ; मनोज जरांगे पाटील यांची टिका

**दैनिक आपला विदर्भ**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** धनंजय मुंडे यांनी पापात सहभागी व्हावे, स्वतःहून मी हे पाप केले, असे म्हणायला पाहिजे, अशी टीका मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिलाय काय नाही दिलाय त्याच काही नाही. मात्र, यातून त्यांची मग्रुरी तशीच दिसत आहे.मुखमंत्री आणि अजित पवार यांना यांची मग्रुरी ही आता समोर आली आहे.



यांची लंका पाण्यात दुबल्या शिवाय राहणार नाही.यांच्यातील मग्रुरी आत्ता महाराष्ट्र सामोरं आलीय. तू हणल्या सारख कर मी मारल्या सारख करतोय अस या सरकारच सुरू आहे. धनंजय मुंडे ३०२ चा आरोपी आहे. अजित पवार आणि मुखमंत्र्याची नैतिकता म्हणून यांनी काल बोलल्या नंतर राजीनामा घेतला. या टोळीचा नायनाट लोक करतील. यांच्याकडे पैसे जास्त झाले की हे जास्त माजतात. धनंजय मुंडे ३०२ मध्ये आहेत. या प्रकरणाचा तपास पुन्हा पुन्हा करावा, यात सर्वसह आरोपी झाले पाहिजे, यांना चौकात गोळ्या घातल्या पाहिजे.सरमांडे याला माझं म्हणणं आहे तुमच्या डोक्यावर हे पाप घेऊ नका धनंजय मुंडे यांचे नाव त्यांनी घ्यावे. ८० दिवसानंतर हे प्रकरण कुठं तरी देशमुख परिवारकडे दडपण्याचा पर्यंत होता. मात्र, जनतेने हा लढा हातात घेतला म्हणून आज राजीनामा झाला. धनंजय मुंडे यांनी पापात सहभागी व्हावं, स्वतःहून मी हे पाप केलं अस म्हणायला पाहिजे. कृष्णा आंधळे याला धनंजय मुंडे यांनी गायब केले. त्या चाटे चा मोबाईल ही धनंजय मुंडे यांच्याकडे आहे.त्यांनी आमदारकीचा पण राजीनामा द्यावा, असे मत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले.

## धनंजय मुंडे यांचा आधीच राजीनामा व्हायला पाहिजे होता : पंकजा मुंडे

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** त्या मुलांमुळे संपूर्ण राज्यातील समाज ज्यांचा कुठलाही दोष नाही, त्यांची बदनामी झाली आहे. संतोष देशमुख यांचा समाज सुद्धा आक्रोशात वावरत आहे. आपल्या राज्यात कुठलीही गोष्ट जातीवर जात जाते. अमानुषपणे एखाद्याला संपवणाऱ्या आणि हल्ला करणाऱ्या लोकांना कुठलीही जात नसते. गुन्हेगारांना जशी कुठली जात नसते तशीच राजकारण्यांना सुद्धा कुठली जात नसते, हे लक्षात ठेवले पाहिजे. असे मत पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, काल काही व्हिडिओज सोशल मीडिया वरती व्हायरल झाले होते. संतोष देशमुख यांच्या हत्येचे ते व्हिडिओ होते. ते व्हिडिओ उघडून पाहण्याची सुद्धा माझी हिम्मत झाली नाही. ज्या लोकांनी संतोष देशमुख यांची अमानुषपणे हत्या केली आहे आणि या घटनेचा व्हिडिओ केला आहे. त्या लोकांमध्ये एवढी निर्मनुष्यता आहे हे त्या व्हिडिओतून दिसत आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर मी मुख्यमंत्र्यांना पत्र दिले होते, त्यात मी माझी भूमिका मांडली होती. या हत्येमध्ये कोण इनवॉल आहे? कोणाकोणाचा हात आहे? हे फक्त तपास यंत्रणांना माहीत आहे. मी यात हस्तक्षेप करण्याचा काही संबंध नाही. ज्या मुलांनी ही हत्या केलेली आहे, त्या मुलांमुळे संपूर्ण राज्यातील समाज ज्यांचा कुठलाही दोष नाही, त्यांची बदनामी झाली आहे. संतोष देशमुख यांचा समाज सुद्धा आक्रोशात वावरत आहे.आपल्या राज्यात कुठलीही गोष्ट जातीवर जात जाते. अमानुषपणे एखाद्याला संपवणाऱ्या आणि हल्ला करणाऱ्या लोकांना कुठलीही जात नसते. गुन्हेगारांना जशी कुठली जात नसते तशीच राजकारण्यांना सुद्धा कुठली जात नसते, हे लक्षात ठेवले पाहिजे. मी आमदारकीची शपथ घेतली, तेव्हाच कोणाबद्दल आक्रोश बाळगणार नाही,अशी शपथ घेतली आहे. त्यामुळे याही प्रकरणात कुठलाही जातीवाद होण्याचा प्रयत्न होऊ नये, मी संतोष देशमुख यांच्या आईची आणि कुटुंबीयांची हात जोडून माफी मागते. या प्रकरणातल्या गुन्हेगारांना कडक शिक्षा व्हावी हीच माझी मागणी आहे. धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याचे स्वागत आहे. पण हा राजीनामा फार आधी व्हायला पाहिजे होता. राजीनामा घेणाऱ्यांनी सुद्धा आधीच राजीनामा घ्यायला पाहिजे होता. असे मत पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.



DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### अबू आझमीच्या औरंगजेबाच्या वक्तव्याच्या विरोधात नवनीत राणा आक्रमक



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** आमदार अबू आझमीच्या औरंगजेब नी एक प्रशासन चालविले. त्यांनी राजा म्हणून काम केले, ते खुप चांगल काम केले असे वक्तव्य आमदार अबू आझमीच्या यांनी केल्यानंतर माजी खासदार नवनीत राणा यांनी आक्रमक पवित्रा घेत प्रत्युत्तर दिले आहे. आमदार अबू आझमीवर टिका करताना माजी खासदार नवनीत राणा म्हणाल्या की, अबू आझमी यांनी आधी छावा चित्रपट पाहून यावे, त्यात जो इतिहास आहे जो इतिहास आम्हाला शिकवला आहे. संभाजी महाराजांवर अत्याचार करणारा हा औरंगजेबच होता. महाराष्ट्र सरकारने औरंगाबादचे नाव चेंज करून संभाजी नगर केले, संभाजी महाराजांच्या नावाने केले आहे. औरंगजेबला बाप मानणाऱ्यांना महाराष्ट्र सरकारने उत्तर द्यावे, हिंदुत्ववादी सरकारने औरंगजेबाची कबद उखडून फेकून द्यावी, ज्यांना औरंगजेबावर प्रेम आहे. त्यांनी आपल्या घरात औरंगजेबाची कबर सजवावी, अशी टिका माजी खासदार नवनीत राणा यांनी केली.

### वाल्मीक कराड विरोधात शिवसेना आक्रमक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** वाल्मिक कराड याला कठोरात कठोर शिक्षा व्हावी, यासाठी शिवसेना महिला आघाडी आक्रमक भूमिका घेत शिंदेंच्या शिवसेनेचे कार्यालय बाळासाहेब भवन बाहेर आंदोलन केले. बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणी व्हायरल झालेले फोटो आणि व्हिडिओ नंतर शिवसेना महिला आघाडीच्या वतीने आक्रमक भूमिका घेत वाल्मिक कराड याला फाशी शिक्षा देण्याची मागणी केली. जोपर्यंत वाल्मिक कराड याला फाशी होत नाही, तोपर्यंत शिवसेना आक्रमक भूमिका घेईल. ज्याप्रकारे काल आम्ही फोटो आणि व्हिडिओ पाहिले त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक जण काल रात्री शांतपणे झोपला नाही.इतक्या क्रूरपणे हत्या करणारी ही वृत्ती नष्ट झाली पाहिजे, त्यामुळे वाल्मिक कराडला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली.

### अकोल्यात उद्धव ठाकरे गटाकडून अबू आझमींच्या विरोधात आंदोलन




दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** अकोल्यात उद्धव ठाकरे गटाने अबू आझमी विरोधात शेन फेक आंदोलन केले आहे. तर औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता, असे वक्तव्य समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी केले होते. त्यांच्या या वक्तव्यावरुन राज्यात मोठा वाद निर्माण झाला आहे. अबू आझमींच्या वक्तव्याचे अकोल्यात पडसाद उमटले आहेत. आता अबू आझमी यांच्यावर जोरदार हल्लाबोल करीत ठाकरे गटाने रास्ता रोको केला आहे. तसेच अबू आझमी यांच्या प्रतिमेवर शेन फेको आंदोलन करत त्यासोबतच गधा अब्बू आजमी अशी पोस्टर लावत त्यांच्या वक्तव्याचा निषेध केला आहे. अकोल्यातल्या गांधी चौकात ठाकरे गटाने हे आंदोलन केले आहे. ठाकरे गटाचे शहर प्रमुख राजेश मिश्रा यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले.तर आंदोलन दरम्यान गांधी चौकातील सर्व ट्राफिक जाम झाली होती...!

### पुण्यात हिरे व्यापाऱ्याचं अपहरण; आरोपींनी मागितली दोन कोटींची खंडणी

**पुणे/प्रतिनिधी :** विद्येच्या माहेरघरात गेल्या काही दिवसांपासून विविध गुन्ह्यात वाढ होताना दिसत आहे. स्वारगेट इथल्या महिला अत्याचाराची घटना ताजी असताना आता पुण्यातील बिबवेवाडी इथं सोमवारी सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास व्यापाऱ्याचं अपहरण करण्यात आलं. दोन कोटी रुपयांसाठी हिरे व्यापाऱ्याचं अपहरण करण्यात आलं आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. अपहरण झालेल्या व्यापाऱ्याच्या पत्नीनं याबाबत तक्रार दाखल केली. त्यानुसार अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

व्यापाऱ्याच्या मोबाईलवरुन पत्नीला केला फोन : याबाबत अधिक माहिती अशी की, सोमवारी सायंकाळी या व्यापाऱ्याचं अपहरण करण्यात आलं. अपहरणकर्त्यांनी व्यापाऱ्याच्या मोबाईलवरुन त्यांच्या पत्नीला फोन केला. यावेळी अपहरणकर्त्यांनी २ कोटी रुपये तयार ठेवा, असं सांगून मोबाईल स्विच ऑफ केला. दरम्यान दोन तास उलटून गेल्यानंतरही फोन न आल्यानं व्यापाऱ्याच्या पत्नीनं पोलीस नियंत्रण कक्षाला याबाबतची माहिती दिली.

# धनंजय मुंडेनी महाराजांचे चरित्र वाचावे - संभाजी भिडे यांचा सल्ला

दैनिक आपला विदर्भ



**सांगली/प्रतिनिधी :** धनंजय मुंढे जे काय वागतायत त्यांनी संभाजी महाराज, शिवाजी महाराज, शहाजी राजे यांचे चरित्र वाचावे, मराठ्यांचा इतिहास पाहावा, मराठ्यांनी आरक्षण मागायचे नाही. तर देश चालवायचा मराठा समाजाला सांगेल कोण हे कळत नाही हे दुर्दैव आहे. अशी टीका संभाजी भिडे यांनी करीत धनंजय मुंडे यांना महाराजांचे चरित्र वाचावे असा सल्ला दिला.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, महानगरपालिका घरपट्टीची वाढ प्रचंड झाली आहे. सर्व कुटुंबात अस्वस्थता तयार झाली आहे. वाढ करणारे काही शत्रू नाहीत. घरपट्टी का वाढली, याच्यावर विचार मंथन होणे गरजेचे आहे.ही अस्वस्थता घरपट्टी पुरती नसून अनेक विषयात आहे. या अनेक विषयांमुळे महाराष्ट्र अस्वस्थ आहे. राज्यात लोकशाही आहे. लोकप्रतिनिधी चांगले आहेत. पण अस्वस्थता आहे. या महानगरपालिकेतील घरपट्टी वाढीचे सूत्रधार आहेत. त्यांनी प्रत्येक मतदारसंघात एक स्वातंत्र्य बैठक घेऊन घरपट्टी वाढ का केली हे सांगितले पाहिजे, आयुक्त खूप दिवसांनी चांगले मिळाले आहेत. निष्कलंक, चांगले कार्यकर्तृत्व, लोकांकल्यानाची हवं असणारे आयुक्त आहेत. ७८ ठिकाणी तातडीने चार दिवसात सभा झाल्या पाहिजेत. पक्षीय भूत बाजुला फेकून सभा घेतल्या पाहिजेत. यामुळे संताप शांत होईल याला राजकीय वळण येणार नाही, याची दक्षता घेतली पाहिजे पिंडवरचा कावळा अशी राजकीय लोकांची भूमिका असते. शासकीय यंत्रणातील चांगले लोक, प्रभागातील लोकप्रतिनिधी यांनी पुढाकार घेऊन जनजागृती अथवा त्यांना कारण सांगावे पोरकाटपणा होता कामा नये, या विषयात शेरीनाला हे भूत महापालिकेच्या मानगुटीवर अनेकवर्षे बसलेला आहे. कावीळ सारखे अनेक आजार होतायत. रोगराई पसरत आहे. एखादा चांगला लोकप्रतिधी च्या हातात विषय दिला असता तर त्याने सोडवला असता. बलात्कार नकोच आहेत. या बलात्कार प्रश्र्नी विधानसभेचा वेळ जावा का? दिसेल तिथे ठार मारावे. रोज बलात्काराच्या घटना घडत आहेत. या देशात बलात्कार म्हणजे मातृभूमीसाठी केलेला विभीचर आहे. देवेंद्र फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे हे चांगले प्रशासक आहेत. त्यांचे खाजगी अधिकारी येऊन तातडीने बैठक घेतली पाहिजे.खूप लोक घरपट्टी बुडवतात धनदांडगे यांच्यात बुडवणारे आहे. राजकारण्याच्या हातात प्रश्र्न देऊन देशाची माती झाली आहे. कृष्णा काठ कर्तृत्वान लोकांचा काठ आहे. गंभीरपणाने प्रश्र्न उलठून टाकले पाहिजे, देशात दारू विक्री बंद केली पाहिजे. अंमली पदार्थ सुशिक्षित समाजात चालू दिले नाही पाहिजे. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान चांगले काम करणार आहे जे देशात उदाहरणं होईल. नुसते कागद छापून, बिले देऊन घरपट्टी वाढ चालणार नाही. चित्रपटाचा परिणाम हा तात्कालिक असतो. संभाजी महाराजांच्या प्रेरणेने असंख्य तरुण निर्माण केले पाहिजे. हा दुःखाचा महिना आहे. संभाजी महाराजांचे बलिदान हे देशाला जोडलेला आहे या बलिदान मधून देशाचा शत्रू इस्लाम गेला विश्र्वाच्या संघर्षातून शिवाजी, संभाजी यांचे प्रेरणा महत्वाची आहे.



अबू आझामी सारखे नेते हे देशाचे एक नंबरचे शत्रू आहेत. हिंदू समाज शेकडो वर्षे गुलामगिरीत जगलेला धर्म आहे. दिल्लीतील कार्यक्रम इस्लाम, परदेशाच्या प्रभावाखालचा आहे . धनंजय मुंढे जे काय वागतायत त्यांनी संभाजी महाराज शिवाजी महाराज, शहाजी राजे यांचे चरित्र वाचावे मराठ्यांचा इतिहास पाहावा, मराठ्यांनी आरक्षण मागायचे नाही तर देश चालवायचा मराठा समाजाला आवण कोण आहोत हे कळत नाही हे दुर्दैव आहे. त्यांना आपण कोण आहोत हे कळलं तर देशाचे कल्याण होईल.आताचे त्रिमूर्तीचे शासन आहे. त्यांची बुद्धी चालणार नाही पहिल्यांदाच हे तिघे एकत्र आले आहेत ही जमेची बाजू आहे. असे मत संभाजी भिडे यांनी व्यक्त केले.

## स्वयं अर्थसहाय्यिता नवीन शाळांना मान्यता व दर्जावाढीची शिफारस; हरकती मागविल्या




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा अधिनियमानुसार नवीन शाळांना मान्यता व विद्यमान शाळांना दर्जावाढीचा प्रस्तावाची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये जिल्ह्यातील दोन नवीन शाळांना मान्यता व एका शाळेच्या दर्जावाढ मान्यतेसाठी शासनाकडे शिफारस करण्यात आली आहे. या प्रस्तावासंदर्भात कोणाची हरकत असल्यास पंधरा दिवसाच्या आत सदस्य सचिव क्षेत्रस्तरीय प्राधिकरण तथा उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद यांच्याकडे सादर करावी, असे आवाहन उपशिक्षणाधिकारी(मा) यांनी केले आहे.

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा अधिनियम २०१२ व नियम २०२० अंतर्गत नवीन शाळा मान्यता व विद्यमान शाळांची दर्जावाढ करण्याच्या प्रस्तावांबाबत राज्यस्तरीय प्राधिकरणाची बैठक दि. १८ फेब्रुवारी २०२५ रोजी घेण्यात आली. त्यानुसार प्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या शाळांची यादी www.mahasfs.org व www.education.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील दोन नवीन शाळांना मान्यता तर एका शाळांची दर्जावाढीची शासनाकडे शिफारस करण्यात आली आहे.

दर्जावाढ शाळा : वैभव माध्यमिक विद्यालय, वर्दडी बु. ता. सिंदखेड राजा जि.बुलढाणा या शाळांची उच्च प्राथमिक ते माध्यमिक शाळेला जोडून उच्च माध्यमिक ११ व १२ वी सर्व शाखा कला, वाणिज्य शाख मराठी आणि विज्ञान शाखा इंग्रजी माध्यम असा जर्दावाढीची शिफारस आहे. नवीन शाळा : १) राजर्षी शाहू ज्युनिअर कॉलेज, चिंचपुर ता.खामगाव जि.बुलढाणा या शाळेची उच्च माध्यमिक ११ ते १२ वी कला,वाणिज्य व विज्ञान प्रकारात २) स्व. सुशिलाबाई जैस्वाल पब्लिक स्कुल, पान्हेरा ता.मोताळा जि.बुलढाणा या शाळेची प्राथमिक ते उच्च माध्यमिक ११ व १२ वीच्या सर्व शाखा याप्रमाणे शिफारस आहे.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा अधिनियम २०१२ दि. १९ जानेवारी २०१३ नियम ६(२) नुसार प्रसिद्ध करण्यात आलेल्या नोटीस संदर्भात कोणाची हकरत असल्यास पंधरा दिवसाच्या आत सादर करावी. अन्यथा सदर निर्णयास कोणाचीही हकरत नाही, असे गृहीत धरुन पुढील निर्णय घेतले जातील. उशिरा आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही, यांची नोंद घ्यावी, असे प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

# शेगांव येथे शुक्रवारी रोजगार मेळावा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर व सिद्धिविनायक टेक्निकल, शेंगाव यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. ७ मार्च २०२५ रोजी शेगांव येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याचा इच्छुक पात्रकाधारक उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक संचालक गणेश बिटोडे यांनी केले आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि केंद्र शासनाच्या श्रम आणि रोजगार मंत्रालय अंतर्गत नॅशनल करियर सर्विसच्यावतीने बुलढाणा जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना रोजगार मेळाव्यात नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहे. सदर रोजगार मेळाव्यामध्ये भास्कर सर्विसेस टॅलेंट सेतु पुणे, वन एशिया खामगाव, क्रेडिट ॲक्सेस ग्रामीण कूटा यासारख्या नऊपेक्षा अधिक नामांकित उद्योजकांनी त्यांच्याकडील ४७० पेक्षा अधिक रिक्त पदे अधिसुचित केलेली आहे. मेळाव्याद्वारे नामांकित कंपनी प्रतिनिधीद्वारे गरजु व रोजगार इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेऊन त्यांची प्राथमिक निवड करण्यात येणार आहे.




कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या https://mahaswayam.gov.in व श्रम आणि रोजगार मंत्रालय भरात सरकार अंतर्गत मॉडेल करीयर सेंटरच्या https://www.ncs.gov.in या संकेतस्थळावर नाव नोंदणी असलेल्या अथवा नसलेल्या १० वी, १२ वी, आय टी आय, पदवीधर पुरुष महिला उमेदवारांनी शुक्रवार दि. ७ मार्च रोजी सिद्धिविनायक टेक्निकल कॅम्पस, शेगांव येथे प्रत्यक्ष उपस्थित राहुन सहभागी होऊन रोजगारांची संधी उपलब्ध करून घ्यावी.

या रोजगार मेळाव्यात सहभागी होण्याकरीता कार्यालयात येण्याची गरज नाही.

रोजगार मेळाव्यात पात्र,गरजु व नौकरी इच्छुक स्त्री-पुरुष उमेदवार आपल्या शैक्षणिक पात्रतेच्या आधारे एकापेक्षा जास्त पदांकरीता सुध्दा अर्ज करु शकतात. तरी इच्छुक उमेदवारांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह सकाळी १० वाजता स्वखर्चाने उपस्थित राहुन आपले नाव नोंदणी करावे. अधिक माहितीसाठी कार्यालयाचा दूरध्वनी ०७२६२-२४२३४२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# जिल्हा रुग्णालयात जागतिक श्रवण दिन साजरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जागतिक आरोग्य संघटनेमार्फत दि. ३ मार्च हा दिवस जागतिक श्रवण दिवस म्हणून साजरा केला जातो. त्याअनुषंगाने जिल्हा रुग्णालयात जागतिक श्रवण दिन साजरा करण्यात आला. यावेळी वैद्यकीय अधिकारी यांनी श्रवण आजार व निदानाच्या विविध पद्धतीबाबत मार्गदर्शन केले.

श्रवण व श्रवण संबंधी उद्भवणाऱ्या विविध आजारांबाबत जनजागृती निर्माण व्हावी व प्राथमिक अवस्थेत श्रवणव्याधींचे निदान होवून योग्य वेळी उपचार व्हावे हा त्यामागचा प्रमुख हेतू आहे. यावर्षी जागतिक आरोग्य संघटनेद्वारे Changing Mindset- Empower Yourself To Make Ear Hearing Care - Reality Of -ll ह्या थीमसह जागतिक श्रवण दिवस साजरा करण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे. या थीमनुसार जिल्हास्तरीय कार्यक्रम जिल्हा रुग्णालय येथे पार पडला. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक विश्र्वास खर्चे, जिल्हा स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक तथा जेष्ठ कान नाक घसा तज्ञ डॉ.प्रशांत पाटील तसेच मुख्य अधिपरिचारिका, जिल्हा परिचार्या, प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्या, प्राध्यापक व विद्यार्थिनी उपस्थित होते.

श्रवण तज्ञ डॉ. सोनुने ह्यांनी राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत जिल्हा स्तरावर सुरु असलेल्या राष्ट्रीय कर्णबधिरता प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सेवांबाबत विस्तृत प्रस्तावना उपस्थितांना विषद केली. जिल्हा स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ.प्रशांत पाटील यांनी श्रवण आजारांबाबत प्राथमिक अवस्थेत निदानाच्या विविध पद्धतीचा उपयोग शासकीय यंत्रणेत कसा करावा या बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच अध्यक्षीय भाषणात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भुसारी यांनी जागतिक आरोग्य संघटनेच्या थीमनुसार जिल्ह्यातील विविध आरोग्य संस्थांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा अधिक प्रभावीपणे कशाप्रकारे पुरविण्यात येतील याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाचे प्रभारी जिल्हा कार्यक्रम समन्वयक डॉ. पंकज राठोड ह्यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा रुग्णालयातील डी.ई.आय.सी. विभागातील भाषा व श्रवण तज्ञ डॉ. प्रियंका राठोड, कान नाक घसा विभागातील अधिकारी भक्तराज मानतकर, स्वप्नील वायाळ ह्यांनी नियोजन केले. कार्यक्रमाच्या शेवटी डी.ई.आय.सी. विभागातील मनोविकार चिकित्सक सिध्दार्थ जाधव ह्यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

# ही माणसं नाहीत, हैवान आहेत; सुप्रिया सुळे

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** नैतिकता की वैद्यकीय कारणाने राजीनामा दिला, हे आधी स्पष्ट करा. ही माणसे नाहीत, हैवान आहेत. फोटो पाहून राज्य हळहळतोय. बीड हे सुसंस्कृत शहर आहे, तिथे हे हैवान आहेत. अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी बोलताना केली.

यावेळी पुढे म्हणाल्या की, अजित पवार आणि छगन भुजबळ यांना हा नैतिकतेने निर्णय घ्यावा, असं वाटलं असेल. मी विरोधात आहे, म्हणून विरोध करणार नाही. मी त्याचा स्वागत करेन. मी या दोन्ही नेत्यांचा आदर करते, ते माझ्यापेक्षा मोठे आहेत. पण मुंडे म्हणतात वैद्यकीय कारणाने राजीनामा दिला. ही काय चेष्टा लावली आहे का? याचं उत्तर द्यावे. सर्व नेत्यांनी जे आरोप केलेत याची पारदर्शक तपासणी व्हायला हवी. संतोष देशमुखांच्या हत्येत ज्या कोणाचा हात असेल त्या प्रत्येकाला चौकात फाशी द्यायला हवी. दिल्लीत जाऊन मी आणि बजरंग सोनवणे लवकरचं अमित शाह यांना भेटणार आहे. आत्तापर्यंत जे घडलं ते शाह यांच्या कानावर घालणार आहे. खंडणी हा गुन्हा देशात खूप मोठा गुन्हा आहे. मनमोहन सिंग सरकारनं पीएमएल घेतला आहे. समाज म्हणून राज्य म्हणून हे कारवाई होत नाही हे आपल दुर्दैवी आहे. एवढे मोठे सरकार आहे. एवढी संख्या आहे. खंडणी, कृषी घोटाळा, यासाठी मत थोडे दिले आहेत. धनंजय मुंडेंनी ट्विट केलंय. दुसरीकडे अजित पवार आणि छगन भुजबळ यांनी नैतिकतेवर राजीनामा दिल्याचे म्हटले. पण धनंजय मुंडेंच्या ट्विटमध्ये नैतिकतेमधील न चा ही उल्लेख केलेला नाही. हा किती मोठा विरोधाभास आहे. एकीकडे नैतिकतेवर राजीनामा दिल्याचे म्हटले जाते अन् दुसरीकडे वैद्यकीय कारण मुंडेंनी दिले. यातून मोठा विरोधाभास दिसतो. हे खूप भयानक आहे, जी चार्जशीट बाहेर आली. त्यातील फोटो मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी पाहिले असतील ना? मग राजीनामा घ्यायला एवढा वेळ का लागला? सुरेश धस आणि अंजली दमानिया यांनी सिडीआर समोर आणलेले आहेत. वाल्मिक कराड आणि धनंजय मुंडे यांचा संवाद हत्येच्या अर्धा तासांमध्ये झालाय, याचा अर्थ काय काढायचा आम्ही? ८४ दिवस याकडे कानाडोळा केला. आता काय म्हणतात नैतिकतेवर राजीनामा दिला.



पण ज्यांनी राजीनामा दिले ते वैद्यकीय कारणाने हा निर्णय घेतल्याचं म्हटले आहे. राज्याला किती फसवणार? सगळा राज्य हताश झालाय. सुरेश धस म्हणतात ते सत्य आहे. धनंजय मुंडे आणि नैतिकता याचा दुरान्वये संबंध येत नाही. ते आज मुंडेंच्या ट्विट वरून स्पष्ट होतो. अशी टिका राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली.

विविध वृत्त...

## वाल्मिक कराडच्या प्रतिमेला शिवसैनिकांनी मारले जोडे, फाशी देण्याची केली मागणी



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मस्साजोग येथील सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणात आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, या मागणीसाठी मंगळवारी सायंकाळी शिवसैनिकांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात आरोपी वाल्मिक कराडच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करून घटनेचा निषेध व्यक्त केला. सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणाचे व्हिडिओ व छायाचित्र व्हायरल झाले आहेत. आरोपींनी अतिशय क्रूरपणे सरपंच देशमुख यांची हत्या केली. या घटनेचा तीव्र संताप शिवसैनिकांनी प्रतिमेला जोडे मारून संताप व्यक्त केला. तालुकाप्रमुख रामा थारकर, शहर प्रमुख संतोष लिप्ते यांच्या नेतृत्वात हे निषेध आंदोलन करण्यात आले.

## देऊळगाव राजा तालुक्यातील अवसायनातील २९ संस्थांची नोंदणी रद्द होणार; आक्षेप नोंदविण्याचे सहायक निबंधकाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** देऊळगाव राजा तालुक्यातील २९ सहकारी संस्थाची नोंदणी रद्द करण्याची कार्यवाही सहायक निबंधक सहकारी संस्थाव्दारे करण्यात येत आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम ८९(४) नुसार अवसायनातील संस्थाशी ज्या कोण्या व्यक्ती वा संस्थेविरुद्ध काही दावे असल्यास त्यांनी जाहिर सूचना प्रसिद्ध झाल्यचे तारखेपासून दोन महिन्याचे आत नोंदवावे लागणार आहे. त्यानंतर दाव्यांची दखल घेतली जाणार नाही, असे देऊळगाव राजा सहकारी संस्थाचे सहायक निबंधक एस.यु. जगदाळे यांनी कळविले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ नुसार सहकारी संस्था अंतिम अवसायनात घेण्यात अलेल्या अहेत. या संस्थावर अवसायकाची नियुक्ती यापुर्वीच करण्यात आलेली आहे. यापुढील दाखल केलेल्या दाव्याचे नुषंगाने कोणत्याही दावा दाखल न झाल्यास त्यांनतर २९ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

## चिखली तालुक्यातील वळती गावांतून फार्मर आयडी योजनाचा शुभारंभ; शेतकऱ्यांनी योजनाचा लाभ घ्यावा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शासकीय योजनांचा लाभ जलदगतीने पोहचविण्यासाठी केंद्र शासनाने शेतकऱ्यांसाठी आधार कार्डप्रमाणे स्वतंत्र डिजीटल ओळखपत्र देण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेचा शुभारंभ चिखली तालुक्यातील वळती गावापासून तहसीलदार संतोष काकडे यांच्या हस्ते करण्यात आला. तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी डिजीटल फार्मर आयडी तयार करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

योजनेंतर्गत शेतकरी यांना विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी महसूल, कृषी व सीएससी केंद्रामार्फत शेतकरी व त्यांच्या शेताचे आधार सलंग्न माहिती संच तयार करण्याचे काम सुरु आहे. चिखली तहसीलदार संतोष काकडे यांनी चिखली तालुक्यातील ११ मंडळात ग्रीस्टकच्या शिबीराला उपस्थित राहून योजनेचे महत्व लोकांना विषद केले. तसेच फार्मर आयडी तयार करण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी, कृषीसहायक व सीएससी केंद्रांना भेट देण्याचे आवाहन त्यांनी केले. ज्या सीएससी केंद्रावर फार्मर आयडी तयार करण्यास हयगय होत असल्याचे निर्देशात आल्यास अशा केंद्राची मान्यता रद्द करण्यात येईल, अशा सूचना श्री. काकडे यांनी दिल्या.




# अर्धवट माहिती देऊन दिशाभूल करण्याचा प्रयत्न

## डोणगाव जल जीवन मिशन पाणी पुरवठा प्रकरण

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर : डोणगाव नळ पाणी पुरवठा योजना सन २०१४-१५ योजना चालु झाली आणि बंदही झाली आहे. सदर जल जीवन मिशनच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी डोणगाव येथील शेख अय्युब शेख गुलाब यांनी तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करता यावी, यासाठी येत्या आठ दिवसात कागदपत्रे सादर करावे, असे पत्र देऊळगाव राजा पाणीपुरवठा विभागाच्या वतीने ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांना दिले आहे. तर, सदर प्रकरणात अर्धवट माहिती देऊन दिशाभूल करण्याचा प्रयत्न करण्यात आला असा अशी चर्चा सर्वत्र सुरू आहे.**

## जलजीवन मिशनच्या कामाच्या चौकशीसाठी आठ दिवसात दस्त सादर करा



राष्ट्रीय ग्रामीण कार्यक्रम अंतर्गत अर्धवट पडलेले योजनेचे काम.

ग्रामीण पाणीपुरवठा विभाग मेहकर उपअभियंता यांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, सन २०१४-२०१५ कालवधीत झालेली डोणगाव नळ पाणी पुरवठा योजनेची सर्व कागदपत्रे, अभिलेखे, अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका या कार्यालयास सादर करणेबाबत कळविले असता आपण अर्धवटच कागदपत्रे या कार्यालयाला सादर केल्याचे दिसून येत आहे. आपण सुधारित अंदाजपत्रक, सुधारित तांत्रिक मान्यता, सुधारित प्रशासकिय मान्यता हे सर्व कागदपत्रे या कार्यालयाला सादर केले नसल्याने सदर योजनेची चौकशी करणे शक्य होणार नाही. तरी वरिल कागदपत्रे या कार्यालयास येत्या ८ दिवसात पाठविण्यात यावी, जेणे करुन योजनेची निपक्षपणे चौकशी करणे सोईचे होईल. डोणगाव नळ पाणी पुरवठा योजनेची सर्व कागदपत्रे या कार्यालयाला सादर करावी तदनंतरच योजनेची चौकशीची तारिख आपणास कळविण्यात येईल.असे पत्र ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, देऊळगाव राजा उपविभागीय अभियंता यांनी दिले आहे. सदर पत्राच्या प्रतिलिपी बुलढाणा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी. बुलढाणा जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग कार्यकारी अभियंता व शेख अय्युब शेख गुलाब रा. डोणगाव यांना माहितीस दिल्या आहेत.

# जनकल्याण यात्रा पोहोचली बुलढाण्यात

### - विशेष सहाय्य योजनांची जनजागृती
### - जिल्हाधिकारी कार्यालयातून शुभारंभ; योजनांचा जागर होणार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या विशेष सहाय्य विभागाच्या योजनांच्या जनजागृतीसाठी राज्यभरात जनकल्याण यात्रा काढली जात असून ही यात्रा मंगळवारी बुलढाणा येथे पोहोचली. बुलढाणा जिल्हयात या जनकल्याण यात्रेचा शुभारंभ निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, तहसिलदार विजय सवडे यांच्या शुभहस्ते झाला.

या कार्याक्रमास महसुल सहाय्यक अमोल टेंभे, अलका मिसाळ, आशामती कांदे, योगेश कापडे, हर्षल लहाने, सिंधुबाई जाधव, सचिन ठाकरे, गजानन ताकतोडे इत्यादी जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते. यावेळी विशेष सहाय्य विभागाच्या सहा प्रमुख योजनांवर आधारित माहितीपटाचे प्रदर्शन, माहितीपत्रके वितरण आणि मार्गदर्शन करण्यात आले. तसेच लाभार्थ्यांना डीबीटी पोर्टलद्वारे थेट बँक खात्यात अनुदान मिळण्याच्या प्रक्रियेची माहिती देण्यात आली.

या जनकल्यान यात्रेचा शुभारंभ विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते दिंडोरी, नाशिक येथे नुकताच करण्यात आला होता. या जनकल्याण यात्रा माध्यमातून विशेष सहाय्य योजनांचा व्यापक प्रसार करण्यात येत असून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात या योजनांचा प्रसार करण्यात आला. या यात्रेत मोबाईल एलईडी व्हॅनच्या सहाय्याने राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये विशेष सहाय्य विभागाच्या योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवली जात आहे. गरजू, वंचित, वृद्ध, विधवा, दिव्यांग आणि निराधार नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन करणे आणि त्यांची प्रक्रिया सुलभ करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

**या सहा योजनांचा जागर :** विशेष सहाय्य विभागाच्या सहा प्रमुख योजनांचा जागर या यात्रेद्वारे होणार आहे. त्यात श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजना, राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना या योजनांचा जागर केला जाणार आहे. राज्य व केंद्र सरकारच्या सहकार्याने या योजना राबविल्या जात असून लाभार्थ्यांना थेट त्यांच्या बँक खात्यात अनुदान जमा केले जात आहे. यासाठी लाभार्थ्यांचे स्वतःचे बँक खाते आधार कार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी आपल्या तहसील कार्यालय किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केले आहे.

**१५ दिवस चालणार जनकल्याण यात्रा :** ही जनकल्याण यात्रा एकूण १५ दिवस चालणार असून, संपूर्ण जिल्हाभरात फिरून विविध योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवली जाणार आहे. या यात्रेद्वारे नागरिकांना योजनांची संपूर्ण माहिती मिळणार असून, प्रत्येक पात्र लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा. यासाठी तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय किंवा अधिकृत संकेतस्थळावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाने केले आहे.

राज्य शासन आणि केंद्र शासन गोरगरीब, वंचित, वृद्ध, विधवा, दिव्यांग आणि निराधार नागरिकांच्या कल्याणासाठी कटीबद्ध आहे. डीबीटी पोर्टलच्या माध्यमातून लाभार्थ्यांना त्यांच्या बँक खात्यात थेट अनुदान मिळावे, यासाठी शासन प्रयत्नशील आहे. या उपक्रमामुळे भ्रष्टाचार आणि दिरंगाईला आळा बसला असून, गरजू नागरिकांना सहजगत्या अनुदान मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. समाजातील सर्व पात्र लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा.



**- नरहरी झिरवाळ,**
अन्न व औषध प्रशासन
आणि विशेष सहाय्य मंत्री




## चिखली तालुक्यातील वळती गावांतून फार्मर आयडी याजेनाचा शुभारंभ; शेतकऱ्यांनी योजनाचा लाभ घ्यावा

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शासकीय योजनांचा लाभ जलदगतीने पोहचविण्यासाठी केंद्र शासनाने शेतकऱ्यांसाठी आधार कार्डप्रमाणे स्वतंत्र डिजीटल ओळखपत्र देण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेचा शुभारंभ चिखली तालुक्यातील वळती गावापासून तहसीलदार संतोष काकडे यांच्या हस्ते करण्यात आला. तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी डिजीटल फार्मर आयडी तयार करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

योजनेंतर्गत शेतकरी यांना विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी महसूल, कृषी व सीएससी केंद्रामार्फत शेतकरी व त्यांच्या शेताचे आधार सलंग्न माहिती संच तयार करण्याचे काम सुरु आहे. चिखली तहसीलदार संतोष काकडे यांनी चिखली तालुक्यातील ११ मंडळात ग्रीस्टकच्या शिबीराला उपस्थित राहून योजनेचे महत्व लोकांना विषद केले. तसेच फार्मर आयडी तयार करण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी, कृषीसहायक व सीएससी केंद्रांना भेट देण्याचे आवाहन त्यांनी केले. ज्या सीएससी केंद्रावर फार्मर आयडी तयार करण्यास हयगय होत असल्याचे निर्देशात आल्यास अशा केंद्राची मान्यता रद्द करण्यात येईल, अशा सूचना श्री. काकडे यांनी दिल्या.

# वाढदिवसानिमित्त पशुपक्ष्यांसाठी घरटे आणि पाण्याची व्यवस्था, बाजड परिवाराचा आदर्श

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** रिसोड येथील सदा सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे युवा पत्रकार रुपेश पाटील बाजड व बाजड कुटूंबायनी पुढाकार घेऊन यांनी आपल्या पत्नीच्या वाढदिवसानिमित्त वायफळ खर्च न करता पशुपक्ष्यांसाठी घरटे आणि पाण्याची व्यवस्था केली.


हल्ली वाढदिवस म्हटला की गुच्छ फुले केक कापणे अशा प्रकारची फॅशन झाली आहे.

मात्र वाढदिवस ही एक आनंदाची पर्वणी असते ती साजरी झालीच पाहिजे आणि करायलाही पाहिजे त्या अनुषंगाने आपला वाढदिवस कुठे साजरा होतो याला तेवढेच महत्त्व आहे.

युवा पत्रकार रुपेश पाटील बाजड यांच्या पत्नी सौ लक्ष्मी रुपेश बाजड यांच्या वाढदिवसानिमित्त नवचेतना ग्रुप यांच्या माध्यमातून आणि रुपेश पाटील बाजड यांच्या पुढाकारातून गुरांसाठी पाण्याचा हौद चिमण्यांसाठी घरटे आणि पशुपक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था ठिकठिकाणी करण्यात आली आहे.

त्यामुळे या निर्णयाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. आपल्या पत्नीच्या वाढदिवसानिमित्त इतर खर्च टाळून पशुपक्षी आणि गुरांसाठी पाण्याच्या हौद याची व्यवस्था करण्यात आली आहे.

मानव भौतिक सुखांच्या मागे लागला आहे. जगणे डिजिटल झाले आहे. सिमेंटचे जंगल वेगाने फोफावत आहे. मात्र, यामुळे निसर्गाचे संतुलन वेगाने ढासळतेय. पर्यावरणाचा समतोल बिघडत असल्याने हवामानाचे तंत्रही बिघडले आहे. पशुपक्षी नामशेष होत आहेत. निसर्गाचे संतुलन तोलण्याची मोठी जबाबदारी पार पाडणारे पशुपक्षी जगण्यासाठी धडपडत आहे. निसर्गाचे हे धन खरेच जपायचे असेल तर पशुपक्ष्यांसाठी दाणा-पाण्याची सोय समाजातील प्रत्येक घटकाने आवर्जून करावी, असे मत पक्षिप्रेमी रुपेश पाटील बाजड यांनी केली व्यक्त केले आहे.



उन्हाळा म्हणजे जीवाची काहिली करणारा. आसपास दाहक वातावरण, निष्पर्ण होत चाललेले वृक्ष, कोरडे पडत चाललेले जलसाठे. या सगळ्यांचा परिणाम संपूर्ण सृष्टीवर जाणवतेय. मग पक्ष्यांची आणि प्राण्यांची कथा ती काय, सिमेंटच्या जंगलात थेंबभर पाण्यासाठी तगमगणारे पक्षी आणि पाण्याच्या एका घोटासाठी भरकटणारे पशू पाहिले की अंगावर सर्रकन काटा येतो. पशुपक्ष्यांनी पाण्यासाठी दिलेली मूक आर्त हाक मनुष्यांपर्यंत पोहोचणे खरे गरजेचे आहे. त्यामुळे आपल्या पत्नीच्या वाढदिवसानिमित्त इतर खर्च टाळून रिसोड शहरांमध्ये ठीक ठिकाणी पक्षांसाठी घरटे आणि पाणी आणि एका ठिकाणी गुरांच्या पाण्याच्या हौदाची व्यवस्था यावेळी करण्यात आली आहे. त्यामुळे वाढदिवसानिमित्त इतर खर्च न करता पशुपक्ष्यांसाठी दाणा पाण्याची व्यवस्था करावी अशी आवाहन रुपेश पाटील बाजड यांनी केले. यासाठी रिसोड येथील नवचेतना ग्रुपचे विनोद बांगर यांनी पुढाकार घेतला असून ज्यांना ज्यांना घरटे व पशुपक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था करायची आहे त्यांनी नगर परिषद चे पाणीपुरवठा कर्मचारी विनोद बांगर यांच्याशी संपर्क करावा..